MHAU060000762014

<u>नियमित दिवाणी दावा क्र. ०२/२०१४ मधील नि.क्र. ६३ खालील आदेश</u>

वादी यांनी सदर अर्ज प्रतिवादी क्रं. १ चे वारस रेकॉर्डवर आणण्यासाठी अर्ज देण्यास झालेला विलंब माफ करण्यासाठी दाखल केलेला आहे. सदरील प्रकरणात प्रतिवादी क्रं. १ हे दिनांक ३०.०४.२०२१ रोजी मयत झालेले आहेत. त्यांचे वारसास प्रकरणात सामील करण्याचा अर्ज देणेस विलंब माफ व्हावा अशी विनंती केली.

२. सदर अर्जास प्रतिवादी यांनी म्हणणे दाखल करुन सदर वादी यांनी हेतुपरस्करपणे प्रकरण लांबविण्याकरिता वारस रेकॉर्डवर घेण्यासाठीचा अर्ज वेळेच्या आत दिलेला नाही व स्पष्टीकरणही दिलेले नाही. त्यामुळे अर्ज खर्चासहीत नामंजुर करावा अशी विनंती केली.

३. अर्ज व त्यावरील म्हणणे वाचले. युक्तीवाद ऐकला.

४. वादीने सदर खरेदीखत बंधनकारक नाही असे घोषित होवुन मिळण्याकामी दाखल केलेला आहे. वादीच्या अर्जातील कथनानुसार प्रतिवादी क्रं. १ हा दिनांक ३०.०४.२०२१ रोजी मयत झालेला आहे. त्याबाबत वादीने नि.क्रं. ६१ सोबत मृत्युचा दाखला दाखल केलेला असुन त्यामध्ये प्रतिवादी क्रं. १ टिकाराम घोला राठोड हा दिनांक ३०.०४.२०२१ रोजी मयत झाल्याचे नमुद करण्यात आलेले आहे. सदर प्रतिवादी क्रं. १ मयत झाल्यानंतर वादीने प्रस्तुत अर्ज दिनांक १७.०३.२०२२ रोजी दिलेला आहे. तथापी सदर प्रकरणात नियमानुसार प्रतिवादी क्रं. १ चे वारस ९० दवसात रेकॉर्डवर घेणे आवश्यक होते परंतु प्रतिवादी चे वारस वादी हा कोवीड-१९ चे महामारीच्या काळात न्यायालयीन कामकाज प्रभावीत झाले तसेच वादी हा वयोवृध्द असल्यो प्रतिवादी क्रं. १ यास वारस अभिलेखावर घेण्यासाठी विलंब झाल्याचे दिसुन येते. वादीचे वकीलांनी युक्तीवाद केला की प्रतिवादी क्रं. १ मयत झाल्याबाबत वादीस उशिरा समजले तसेच दरम्यानच्या काळात कोरोना महामारीमुळे न्यायालयीन कामकाज स्थगित होते त्यामुळे अर्ज देण्यास विलंब झाला. तरी सदर कारणाचा व नैसर्गिक न्यायतत्वाचा विचार करता सदर दावा हा वाटपाचा असल्यामुळे प्रतिवादी क्रं. १ चे वारस अभिलेखावर घेणे आवश्यक व गरजेचे आहे व त्यामुळे दाव्याच्या गुणदोषावर निर्णय होण्यास मदतच होणार आहे. करीता मी पुढील प्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

**आदेश**

वादी यांचा नि.क्र ६३ चा अर्ज प्रतिवादीस रक्कम रु.३००/-(अक्षरी रुपये तीनशे मात्र) खर्च देण्याच्या अटीवर मंजुर करण्यात येत आहे.

Digitally signed by PRAMOD MANIK KOLSE
Date: 2022.06.09 17:25:53 +0530

**(पी.एम.कोळसे)**

दिनांक- ०८.०६.२०२२

दिवाणी न्यायाधीश, क. स्तर (न्यायालय क्रं.१)
कन्नड

<u>**प्रमाणपत्र**</u>

असे प्रमाणित करणेत येते की, पी.डी.एफ.निकालपत्र/आदेश यामधील सर्व मजकुर मुळ निकालपत्र/आदेशातील मजकुराप्रमाणे तंतोतंत खरा व बरोबर आहे.

लघुलेखकाचे नांव – यो. सु. माळी.
न्यायालयाचे नांव – प्रमोद मा. कोळसे.
दिवाणी न्यायाधीश, (क.स्तर),
तथा प्रथम वर्ग न्यायदंडाधिकारी, कन्नड.
श्रुतलेखन दिल्याचा दिनांक – ०८.०६.२०२२.
न्यायिक अधिका–यांनी
निकालपत्रावर स्वाक्षरी केलेचा दिनांक– ०८.०६.२०२२.
निकालपत्र अपलोड केलेचा दिनांक – ०९.०६.२०२२.

..............................................................